मुहम्मद अली

लोकांना आवडणारे चॅम्पियन

वाल्टर डीन मायर्स

मराठी: अश्विनी बर्वे



" मी अमेरिका आहे "

त्यांचा जन्म लुइसविले, केंटकी मध्ये कैसियस मार्सेलस क्ले, ज्युनियरच्या रुपात झाला होता.त्यांचे सगळ्यात पहिले मुष्टियुद्ध कोच, माजी पोलिस अधिकारी जो मार्टिन यांनी त्यांना सांगितले, "लोकांना आव्हान देण्यास सुरुवात करण्यापूर्वी तू स्वतःशी आधी लढायला शिक."

कधी उपेक्षित समजला जाणारा कैसियस, नंतर मुहम्मद अली या नावाने ओळखला जाऊ लागला आणि त्यांनी शेवटी जगातला हैवीवेट चैंपियनचा किताब मिळवला. प्रसिद्ध लेखक वाल्टर डीन मायर्स यांनी त्या व्यक्तीची सुंदरता आणि शक्ती त्यांच्या शब्दात लिहिली : तो फुलपाखरासारखा तरंगू शकतो आणि मधमाशी सारखा डंख मारू शकतो."




मुहम्मद अली

लोकांचा आवडता खेळाडू

वाल्टर डीन मायर्स

चित्र: एलिक्स डेलिनोइस







“जेव्हा तो छोटा मुलगा होता तेव्हा आम्ही मुहम्मदला "जीजी“ म्हणत असू कारण तो नेहमी 'जी, जी, जी, जी' म्हणत असे.“ खेळाडूची आई, ओडेसा "बर्ड" क्लेने सांगितले. “आणि मग, जेव्हा तो गोल्डन ग्लव्स खेळाडू झाला,तेव्हा त्याने आम्हाला सांगितले की तो “'गोल्डन ग्लव्स' म्हणण्याचा प्रयत्न करत होता.”

मुहम्मद अलीचा जन्म १७ जानेवारी,१९४२ला लुइसविले, केंटकीमध्ये झाला होता. त्यांच्या आईवडिलांनी त्यांचे नाव कैसियस मार्सेलस क्ले, ज्युनियर ठेवले.




लुइसविले एक शांत दक्षिणी शहर होते. लोक येण्याजाण्यासाठी बसने प्रवास करत असत,पण खूप तरुण मुलांना सायकल चालवायला आवडत असे.

"एका रात्री तो मुलगा खाली आला आणि तो रडत होता. कोणीतरी त्याची सायकल चोरली होती. त्यामुळे त्याला खूप त्रास होत होता. जो मार्टिन म्हणाले “तो तेव्हा केवळ बारा वर्षांचा होता, आणि सायकल चोरणाऱ्याला मारायला चालला होता. मी म्हटले, ठीक आहे, तू कोणाला आव्हान देण्यापूर्वी तू स्वतः लढायला शिक.”

आपल्या रिकाम्या वेळात जो मार्टिन मुलांना बॉक्सिंग शिकवत असत. लवकरच कैसियसपण त्यांचा एक विद्यार्थी झाला.

कैसियसने जिममध्ये कठोर प्रशिक्षण घेतले. तो जोरात मारू शकत नसे पण तो वेगाने पुढे जाऊ शकत होता. तो तेव्हाही खूप गप्पा मारत असे, तर तो आपल्या स्पर्धकांबरोबर कसे वागत असेल.

छंद म्हणून स्पर्धेत खेळल्यानंतर, कैसियस गोल्डन ग्लव्स चॅम्पियन झाला.






१९६० मध्ये, १८ वर्षाचा असतांना, त्यांनी अमेरिकी ऑलम्पिक मुष्टियुद्ध टिममध्ये जागा मिळवण्याइतके ते पात्र झाले. ते खेळण्यासाठी रोममध्ये जात होते.

कैसियस, जो खूप वेगवान होता,त्याने आपली पहिली लढाई सहज जिंकली. पण चैंपियनशिपसाठी चवथी लढाई खूप कठीण होती.

पहिल्या फेरीत, पोलिश मुष्टियोद्धा ज़्बीग्न्येव पीटरजीकोव्स्कीने, कैसियसला चारी बाजूने ढकलण्यासाठी आपल्या कौर्याचा आणि अनुभवाचा उपयोग केला. दुसऱ्या फेरीत कैसियस अजूनही हारत होता. पण तिसऱ्या फेरीत कैसियस क्लेचे कौशल्य समोर आले. त्याने म्हाताऱ्या माणसाला बुक्का मारण्यासाठी आपल्या कौशल्याचा भरपूर उपयोग केला. कैसियस क्ले, ज्यूनियर याने सुवर्णपदक जिंकले. रात्रीतून तो जगभर प्रसिद्ध झाला.




अमेरिकेत अजूनही अशा काही जागा होत्या जिथे काळे लोक जाऊ शकत नाही.

जरी त्याने ऑलम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकलेले असो.

लुइसविले प्रायोजन समूहाने कैसियस मध्ये रुची दाखवली. आणि एक पूर्व-लाइट-हैवीवेट चॅम्पियन, आर्ची मूरबरोबर प्रशिक्षणाची व्यवस्था केली. पण मूरच्या लढाईची पद्धत वेगळी होती. कैसियससाठी खूप रक्षात्मक होती. तो आपल्या वेगाकडे आणि फुटवर्कवर लक्ष देऊ इच्छित होता. म्हणून त्याने प्रशिक्षक बदलले. आपली पहिली व्यावसायिक लढाईमध्ये कैसियसने ट्यूनी हुन्सेकरला हरवले. पुढच्या तीन वर्षामध्ये त्याने सलग अजून अठरा लढाया जिंकल्या.






पण अनेक प्रशंसकांना त्याच्याबद्दल शंका होती. ते म्हणाले की कैसियसने आपल्या वेगाचा खूप अधिक उपयोग केला आणि आपले हात खूप खाली ठेवले. आणि तो एक हैवीवेट फाइटरसारखा वाटत नव्हता. “मी जगातला सगळ्यात महान लढवय्या आहे,मी जगातला सगळ्यात मोठा कवी आहे! मी श्रेष्ठ आहे.!” तो ओरडला.! लोक कैसियसला "लुइसविले लिप" म्हणू लागले.

कैसियसला लक्ष वेधून घ्यायला आवडत असे.पण त्याचे एक गंभीर रूप सुद्धा होते जे खूप कमी लोकांनी बघितले होते. "केंटुकीमध्ये, काळे लोक बसमध्ये पुढच्या बाजूने चढू शकत नसत,” ते म्हणाले, “आणि न ते एक कप कॉफी पिऊ शकत असत.” जेव्हा काळ्या लोकांनी आपले मानव अधिकार प्राप्त करण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांना कैसियसने त्यांना मारतांना आणि तुरुंगात जातांना बघितले आहेत.

मियामी बीच कनव्हेशन हॉलमधला प्रसंग

क्ले उर्फ लुइसविल लिप



खूप लोकांनी विचार केला की कैसियस एक तेजतर्रार युवक होता. ज्याने पहिले लढवय्याशी सामना केला नव्हता. जेव्हा जगातील हैवीवेट चैंपियन, चार्ल्स "सन्नी" लिस्टनशी लढण्यासाठी एका करारावर सही केली, तेव्हा एका खेळाडूने लिहले, “आमच्यातले काही लोक जुन्या सन्नी लिस्टन बरोबर लढण्याच्या आधी कैसियस क्ले साठी एक मोठी विमा पॉलिसी खरेदी करण्याची इच्छा होती.”

लिस्टन उर्फ द ब्लैक बेयर (काळे अस्वल)



लिस्टन एक क्रूर मुष्टियोद्धा होता. त्याने आपल्या पहिल्या तीन लढाईच्या पहिल्या फेरीत आपल्या प्रतिद्वंदीला नॉकआउट केले आणि लढाई जिंकली होती. पण कैसियस अजूनही आश्वस्त होता. “मी त्या अस्वलाला फरशीवर लोळवण्यास जात आहे,” त्याने सन्नी लिस्टनच्या बाबत म्हटले. “तो विश्व विजेता होण्यासाठी खूप कुरूप आहे. जगाचा विजेता माझ्यासारखी सुंदर व्यक्ती असायला पाहिजे.”



“मी एका फुलपाखरासारखा तरंगेल आणि एका मधमाशी सारखा डंख मारेल, “ कैसियसने एका माणसाला म्हटले. “जर तुमचे डोळे त्याला बघू शकत नसतील तर तुम्ही आपल्या प्रतिद्वंदीच्या हाताने मार खाऊ शकत नाही.”

लढाई सुरु झाली. रागात येऊन लिस्टनने कैसियसवर तीव्र हल्ले केले पण कैसियस त्याच्यापासून वाचत राहिला. कैसियसने लिस्टनला वेगवान, दुखवणारे गुद्दे मारले. सहा फेऱ्या झाल्यावर त्रस्त आणि निराश लिस्टन सातव्या फेरीसाठी बाहेर आला नाही.

मग कैसियस क्ले जगातला हैवीवेट चैंपियन झाला.



एका अल्लाशिवाय दुसरा कोणी देव नाही.



पूर्ण खेळ जगत आश्चर्यचकित झाले. काही दिवसांतच कैसियस क्ले यांनी खेळ जगताला परत एकदा आश्चर्याचा धक्का दिला. त्याने घोषणा केली की त्याने आपला धर्म बदलला आहे आणि आपले नावही बदलले आहे. " माझे नाव मुहम्मद अली आहे, आणि मला नाही वाटत की कोणी मला गुलाम, कैसियस क्ले या नावाने ओळखावे."

लोकांनी त्याला विचारले की तो *नेशन ऑफ इस्लाम मध्ये का सामील झाला? कारण अनेक लोकांना असे वाटते की ते एक धार्मिक संघटन नाही तर उलट द्वेष पसरवणारा समूह आहे.*

" मी एक मुसलमान होणे निवडले आहे. मी अल्लाचा अनुयायी होण्याचे ठरवले आहे.," मुहम्मद अली म्हणाला. " कारण ते एकमेव असे व्यक्ती आहेत ज्यांच्याकडे निश्चित योजना आहे,ज्यामुळे माझ्या लोकांना मदत होईल."

त्याला विचारण्यात आले की तो गोऱ्या लोकांच्या विरोधात आहे का? त्यावेळी ते म्हणाले, "नाही,मला गोरे लोक आवडतात," अली म्हणाले, "मी अमेरिका आहे,मी अमेरिकेचा तो भाग आहे ज्याला तुम्ही ओळखत नाही. पण आता तुम्ही माझी सवय करून घ्या. काळा, आत्मविश्वासी, अहंकारी; माझे नाव तुमचे नाही,माझा धर्म तुमचा नाही,माझे ध्येय माझे स्वतःचे आहे.म्हणून माझी सवय लावून घ्या."

अलीला आशा होती की काळे लोक एकत्र येतील आणि एक दुसऱ्यावर प्रेम करतील. आता तो जगातला हैवीवेट चैंपियन झाला ,तेव्हा त्याने विचार केला की काळ्या लोकांच्या बाजूने उभे राहिले पाहिजे, बोलले पाहिजे ते म्हणाले, “मी रोल्स रॉयल मध्ये प्रवास करून खुश नाही. मी एका पहाडावर उभे राहून खुश नाही. कारण मला माहित आहे की खाली माझे बहीण भाऊ भुकेले आहेत आणि ते सूप पीत आहेत.”

ही १९६७ ची गोष्ट आहे. अमेरिका, व्हिएतनाम मध्ये लढत होता. उत्तर व्हिएतनामी लोकांनी म्हटले की काळे लोक आमचे शत्रू नाहीत.

“ तुमचा वास्तविक संघर्ष तुमच्या जन्मभूमीवर आहे.म्हणून आता घरी परत जा आणि तिथे संघर्ष करा!” ते म्हणाले.





सेनेत भरती होण्यासाठी अमेरिकी पुरुषांना सेनेमध्ये नोंद करावी लागत असे. अलीने आपले नाव नोंदवले, जेव्हा त्याला बोलावण्यात आले, ते तो म्हणाला, “इस्लाम धर्माच्या अनुयायी म्हणून मी अमेरिकेच्या सशस्त्र सेनेत सामील होण्यास नकार देत आहे.” अनेक तरुणांनी आपल्या धार्मिक श्रद्धा म्हणून सेनेत भरती होण्यास नकार दिला होता. त्यांना कर्तव्यनिष्ठ आपत्तिकर्ता म्हटले जाई.

एका न्यायाधीशाने निर्णय दिला की मोहम्मद अली प्रामाणिक आपत्तिकर्ता म्हणून बांधील होते. पण तरीही त्यांना सेवा करण्यास बोलावण्यात आले.
२८ एप्रिल १९६७ला अलीने सेनेत सामील होण्यास नकार दिला.

त्यानंतर त्यांना पाच वर्षाची तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली आणि त्याच्याकडून हैवीवेट चैंपियनशिप हिसकावून घेण्यात आली. काही लोकांना ती शिक्षा उचित वाटली. आणि काही लोकांनी न्यायासाठी उच्च न्यायालयात अपील केली.





अली, ज्यांना आता लढण्याची परवानगी नव्हती, ते आता आपला अधिकांश वेळ एक सार्वजनिक वक्ताच्या रुपात व्यक्त केले. त्यांनी देशभरच्या कॉलेजमध्ये आणि *इस्लाम राष्ट्रच्या बैठकीमध्ये भाषण दिले. त्यांना मुलांशी बोलायला आवडत असे. अनेक लोक त्यांना लोकांचा चॅम्पियन म्हणून ओळखत असत.*

अली तरुण आणि सुंदर होते. त्यांनी "ब्लैक इज ब्यूटीफुल“ या शब्दांना विशेष अर्थ दिला. अली यांना माहीत होते की जर त्यांचे अपील मान्य झाले नाही तर त्यांना जेलमध्ये जावे लागेल. जर त्यांनी आपले मत बदलले आणि सेनेत सामील झाले, तर ते मुष्टियुद्धच्या स्पर्धा खेळू शकत होते आणि एक सहज जीवन जगू शकत होते, पण त्यांनी आपल्या विश्वासाचे पालन करण्याचा निर्णय घेतला. ते म्हणाले, “ज्या व्यक्तीमध्ये जोखीम घेण्याचे साहस नाही ती व्यक्ती जीवनात काहीच मिळवू शकत नाही.”

खरेतर अली याची वाट बघत होते की त्यांच्या अपिलाचा काय परिणाम होईल. त्यावेळी सर्व लोक व्हिएतनामच्या युद्धाकडे आपत्ती म्हणून बघत होते. नागरिक अधिकार आंदोलन वेगात वाढत होते. आता अलीचे वागणे समजणे सोप्पे वाटत होते. ऑक्टोबर १९७० मध्ये शेवटी त्यांना परत लढण्याची परवानगी मिळाली. त्यांनी जेरी क्वारीच्या विरोधात आपला सामना जिंकला.






पण "स्मोकिन' जो फ्रैज़ियर जगातला हैवीवेट चैंपियन होता,आणि मुष्टियुद्ध चाहते या दोन पुरुषांमध्ये होणाऱ्या लढतीची वाट बघत होते.

८ मार्च, १९७१ ला अलीने फ्रेज़ियरच्या विरुद्ध लढाई लढली पण तो ती कठीण लढाई हारला. त्याच्या चाहत्यांना त्याचा मोठा धक्का बसला, पण अलीने खेळत राहण्याचा दृढ निश्चय केला.





काळ्या माणसाला संदेश

२८ जून, १९७१ ला, संयुक्त राज्याच्या सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला की अलीला सेनेत सेवा करण्याची सूट दिली पाहिजे. मुष्टियोद्धा अलीने सुप्रीम कोर्टाची एक महत्वपूर्ण लढाई जिंकली होती.

अली म्हणाला, “जेव्हा मी सेनेत जाण्यास नकार दिला तेव्हा मी स्वतःला कधी महान समजले नाही. मी जो विचार केला होता त्यासाठी मी उभा राहिलो. मला अमेरिकेला अमेरिका करण्याची इच्छा होती. आणि आता पूर्ण जगाला ही गोष्ट माहीत आहे.”



खेळाच्या इतिहासात अली सगळ्यात मनोरंजक फायटर होता. त्यांनी आपल्या काळातल्या सर्व मोठ्या खेळाडूंशी सामना केला.त्यांची सगळ्यात कठीण लढाई मधली एक "रंबल इन द जंगल" नावाने ओळखली जाते. ती मध्य आफ्रिकेत ज़ैरेमध्ये, जॉर्ज फोरमैनशी होणार होती. फोरमैन नवीन हैवीवेट चैंपियन होता. अली, आता बत्तीस वर्षाचा होता, तो तरुण खेळाडू कडून हारेल अशी आशा होती. पण अलीचा एक वेगळा विचार होता. “आता तुम्ही मला बघत आहात,पण तुम्ही हे बघत नाहीत की,जॉर्ज विचार करतो तो मला बघेल पण मला माहीत आहे तो असे कधी करणार नाही.”

जेव्हा लढाई सुरु झाली, तेव्हा आफ्रिकेतील गर्दी जी अलीच्या बाजूने होती, ती परत परत ओरडत होती, “ अली अली!” फोरमैन त्यामुळे त्रासला नाही. तो पुढे आला आणि त्याने अलीला दोरीच्या विरुद्ध बाजूने पकडले.परत-परत अली त्याच्या विशाल बाहूवर झुलत राहिला. अलीच्या चाहत्यांनी त्याला दोरीपासून बाजूला जाण्यास परत परत सांगितले

अलीने फोरमैनला बुक्का मारण्याची परवानगी दिली. त्याने दोरीच्या विरुद्ध बाजूला उभे राहण्याच्या आपल्या योजनेला "रोप-ए-डोप" नाव दिले.

“मी दोरीवर पडलो आणि म्हटले, “ये मला मार, मला वाटले की तू मारशील. तो एक बचावाचा पवित्रा होता.”

आठव्या फेरीत, फोरमैन थकला आणि तेव्हा अलीला आपली संधी मिळाली. अलीचे बुक्के वेगवान आणि जोरदार होते. बिग जॉर्ज फोरमैन आश्चर्यचकित झाला,मग त्याला लागले, तो जमिनीवर अडखळला आणि तेव्हा रेफरीने अंक मोजायला सुरुवात केली. अली परत एकदा विश्व चैंपियन झाला.



"रंबल इन द जंगल" नंतर अली सात वर्षे आणखीन खेळला. शेवटी १९८१ मध्ये तो ३९ वर्षाचा असतांना सेवानिवृत्त झाला. आता त्यांचे बॉक्सिंग मधले कैरियर संपले होते आणि आता ते एक कठीण प्रतिस्पर्धाशी सामना करत होते, एक आजार, ज्याचे नाव "पार्किंसंस“ होते.

“देवाने मला हे लक्षात आणून देण्यासाठी ही शारीरिक दुर्बलता दिली आहे की मी सगळ्यात महान नाही.” अली म्हणाले, “सगळ्यात महान देव आहे!”

१९९६ मध्ये,, अलीला अटलांटा, जॉर्जियामध्ये खेळल्या जाणऱ्या ऑलम्पिक मशाल पेटवण्यास सांगितले गेले. जसे त्याने पेटवण्यास मशाल उचलली तेव्हा सर्व जग बघत होते की त्याच्यामध्ये अजूनही एक लढवय्या आहे आणि तो सतत आपल्या आजाराशी लढत राहिला. जगातील लाखो लोकांनी त्याचा जय-जयकार केला. मुहम्मद अली, वास्तवात लोकांचा आवडता चैंपियन होता.



१७ जानेवारी १९४२ कैसियस मार्सेलस क्ले, जूनियर, लुइसविले मध्ये जन्म झाला.

सप्टेंबर ५,१९६०ला ऑलम्पिक सुवर्णपदक, लाइट-हैवीवेट पदक जिंकले .

२९ ऑक्टोबर १९६० ट्यूनी हन्सेकरच्या विरुद्ध पहिली व्यावसायिक लढाई जिंकली: लुइसविले, कैंटकीमध्ये.

२५ फेब्रुवारी १९६४ वर्ल्ड हैवीवेट सन्मान जिंकण्यासाठी सन्नी लिस्टनला हरवले.मियामी बीच, फ्लोरिडामध्ये .

२६ फेब्रुवारी १९६४ मुस्लिम धर्मात प्रवेश.

६ मार्च, १९६४ मुहम्मद अली नाव घेतले.

२८ एप्रिल १९६७ अमेरिकी सशस्त्रदलात सामील होण्यास नकार दिला.

२७ जून, १९६७ ला मुष्टियोद्धाचा पुरस्कार मिळवला आणि त्यांना खेळ खेळण्यास प्रतिबंध केला गेला.

ऑक्टोबर २६,१९७० जेरी क्वारीच्या विरोधात परत सामना जिंकला: अटलांटामध्ये .

३ मार्च, १९७१ विश्व हैवीवेट चैंपियन जो फ्रेजियरकडून हारले.: न्यूयॉर्कमध्ये .

२८ जून, १९७१ला अमेरिकी सुप्रीम कोर्टाने सशस्त्रदलात सामील होण्यास नकार दिला म्हणून दोषी ठरवले.

ऑक्टोबर ३०.१९७४ जॉर्ज फोरमैनच्या विरुद्ध 'जंगलमध्ये रंबल जिंकले: किंशासा, ज़ैरेमध्ये .

ऑक्टोबर १,१९७५ मनीलामध्ये जो फ्रेजियरच्या विरुद्ध सामना जिंकला.: क्यूज़ोन सिटी, फिलीपींसमध्ये .

११ डिसेंबर १९८१ आपली शेवटची लढाईमध्ये ट्रेवर बर्बिककडून हारले: नासाउ, बहामासमध्ये.

१९ जुलै १९९६ ऑलम्पिक मशाल पेटवली,उन्हाळी ऑलम्पिक खेळ,: अटलांटामध्ये.

१९९८ -संयुक्त राष्ट्र शांति दूतच्या रुपात काम केले.

डिसेंबर २,१९९९ला स्पोर्ट्स इलस्ट्रेटेडकडून *स्पोर्ट्समैन ऑफ द सेंचुरी म्हणून घोषित करण्यात आले.*

९ नोव्हेंबर २००५ला *प्रेसिडेंशियल मेडल ऑफ फ्रीडमकडून* सम्मानित केले गेले.

जव्हा साठच्या दशकाच्या सुरुवातीला कॅसियस क्लेचा उदय झाला,तव्हा त्यांनी काळ्या जीवनात दोन महत्वपूर्ण क्षेत्रांना स्पर्श केला. ते "ब्लैक इज ब्यूटीफुल" चे पूर्ण अवतार होते आणि त्यांनी ब्लैक-पावरच्या विचारांना नवीन अर्थ दिला,त्यांनी केवळ आपला खेळ जिंकला, तर आपल्या अद्भुत व्यक्तिगत साहसाने लोकांना जिंकले. त्यांनी गोऱ्या लोकांविरुद्ध न जाता आपल्या काळ्या रंगाला सुंदरता आणि शक्तीचे प्रतिक म्हणून मान्यता मिळवली. क्ले, आणि नंतर अली ने न केवळ एक काळे हिरो होते तर आपले, हास्य आणि युद्ध-विरोधी मतामुळे ते गोऱ्या तरुण अमेरिकींचे सुद्धा हिरो होते. - वाल्टर डीन मायर्स

